# रोजगार मार्गदर्शन केंद्रातर्फे बुधवारी मेळावा

**अकोला :** जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यात ३ नामांकित खाजगी कंपन्यांमार्फत एकूण १०० रिक्त पदांची भरती केली जाणार आहे. यामध्ये शैक्षणिक पात्रता दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत.

या मेळाव्याकरिता ऑनलाईन अर्ज महास्वयम वेब पोर्टलच्या माध्यमातून करावा व मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्यास प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले आहे.जास्तीत जास्त नोकरी इच्छूक उमेदवारांनी आपले बायोडाटा, शैक्षणिक कागदपत्रे, तसेच पासपोर्ट साईज फोटो व इतर आवश्यक कागदपत्रासह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, प्रशासकीय इमारत, दुसरा माळा, अकोला येथे स्वखर्चाने उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा. मेळाव्यासंबंधीत अधिक माहिती करिता या कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०७२४ – २४३३८४९ किंवा ७०२४२४१०९८ किंवा ९४२१४२५०६६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी केले आहे.

# जि.प.प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

जिल्हा परिषदेच्या ५२ सर्कलसाठी आज आरक्षण सोडत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत नियोजनभवनात काढण्यात आली. त्यानुसार प्रारूप आरक्षणाची अधिसूचना आज प्रसिद्ध करण्यात आली.निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांच्यासह अधिकारी-कर्मचारी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रारूप आरक्षण अधिसूचनेस हरकती असल्यास दि. १७ ऑक्टोबरपूर्वी तहसीलदारांकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.सोडतीनुसार, अनसूचित जातीसाठी एकूण १२ जागा (महिलांसाठी ६), अनुसूचित जमाती एकूण ५ जागा (महिलांसाठी ३), नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग १४ जागा (७ महिला), सर्वसाधारण २१ जागा (महिला १०) अशा प्रकारे एकूण ५२ (महिला २६) आरक्षण निश्चित करण्यात आले.



### तालुकानिहाय आरक्षण

**तेल्हारा** : दानापूर- सर्वसाधारण महिला, अडगाव बु.- अनुसूचित जमाती, शिरसोली- सर्वसाधारण, बेलखेड- सर्वसाधारण महिला, पाथर्डी- सर्वसाधारण, दहिगाव- सर्वसाधारण, भांबेरी- सर्वसाधारण.

**अकोट** : उमरा- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, अकोलखेड- अनुसूचित जमाती महिला, अकोली जहांगीर- अनुसूचित जमाती महिला, वडाळी देशमुख- सर्वसाधारण महिला, मुंडगाव- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, वरूर- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, कुटासा- सर्वसाधारण, चोहोट्टा- सर्वसाधारण महिला.

**मूर्तिजापूर** : लाखपुरी- अनुसूचित जाती, शेलू (बाजार)- अनुसूचित जाती, कुरूम- सर्वसाधारण, माना- सर्वसाधारण महिला, सिरसो- अनुसूचित जाती, हातगाव- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला, कानडी- अनुसूचित जाती महिला

**अकोला** :आगर- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, दहिहंडा- अनुसूचित जाती महिला, घुसर- अनुसूचित जमाती महिला, उगवा- अनुसूचित जाती, बाभुळगाव- अनुसूचित जाती, कुरणखेड- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, कानशिवणी- अनुसूचित जाती महिला, बोरगाव मंजू- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला, चांदूर- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, चिखलगाव- सर्वसाधारण महिला.

**बाळापूर** : अंदुरा- अनुसूचित जाती महिला, हातरूण- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, निमकर्दा- अनुसूचित जाती महिला, व्याळा- सर्वसाधारण, पारस१- सर्वसाधारण, देगाव- अनुसूचित जाती, वाडेगाव- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग

**बार्शिटाकळी** : कान्हेरी सरप- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला, दगडपारवा- सर्वसाधारण महिला, पिंजर- सर्वसाधारण महिला, झोडगा- सर्वसाधारण महिला, महान- सर्वसाधारण, राजंदा- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, जामवसू- सर्वसाधारण.

**पातूर** : शिर्ला- अनुसूचित जाती महिला, चोंडी- अनुसूचित जमाती, विवरा- सर्वसाधारण, सस्ती- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, पिंपळखुटा- नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग, आलेगाव- सर्वसाधारण महिला.

# पातूर येथे युवकाचे अपहरण व बेदम मारहाण

## पोलिसांची तत्पर कारवाई, तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

■पातुर,दि १३ (प्रतिनिधी) :

पातूर शहरातील जुन्या बसस्थानक परिसरात आज १३ ऑक्टोबर रोजी पहाटे दीडच्या सुमारास घडलेल्या धक्कादायक घटनेत तिघा आरोपींनी एक युवकाचे अपहरण करून त्याला लोखंडी रॉड व काठ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून पातूर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मुख्य आरोपीला अटक केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, अक्षय भीमराव उमाळे व त्यांचे जावई शंकर पाटील हे आपल्या मुलाची तब्येत बिघडल्याने रात्रीच्या सुमारास जुन्या बसस्थानकाजवळील एका हॉटेलमध्ये बिस्किट घेण्यासाठी गेले होते. त्याचवेळी आरोपी शिवम उर्फ शिवा नीलकं, आकाश गजानन राऊत आणि योगेश महादेव तायडे हे तिघे त्या ठिकाणी आले. त्यांनी अचानक अक्षय उमाळे यांच्या गाडीची चावी काढून घेतली व कारण नसताना त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली.

दरम्यान, जावई शंकर पाटील यांनी मध्ये पडून वाद शांत करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांनाही ढकलून दिले. त्यानंतर शंकर पाटील यांनी धावत जाऊन जवळच असलेल्या 'पातळी पोळी खानावळीत' आसरा घेतला. त्या दरम्यान आरोपींनी आपल्या आणखी एका साथीदाराला मोबाईलवरून बोलावून घेतले व मिळून अक्षय





उमाळे यांचे अपहरण केले. त्यांनी त्याला शहरातील नानासाहेब वेटाळ चौक परिसरात नेऊन निर्दयतेने मारहाण केली.शिवा नीलखन, आकाश राऊत व योगेश तायडे या तिघांनी मिळून अक्षय उमाळे यांना काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जर तू पोलिसांत तक्रार केलीस तर तुझे जगणे अवघड करू अशी धमकी दिली. दरम्यान शंकर पाटील यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

आरोपींनी पोलिसांनाही धमकावून पळून जाण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत मुख्य आरोपी शिवा निकम याला ताब्यात घेतले.या प्रकरणी फिर्यादी अक्षय उमाळे यांच्या तक्रारीवरून शिवा नीलखन, आकाश गजानन राऊत आणि योगेश महादेव तायडे या तिघांविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गंभीर घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पाणीपट्टी तक्रारींचे एकाच छताखाली निवारण; मनपाच्या वतीने विशेष शिबिर आज

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

अकोला महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या वतीने पूर्व झोनमधील नागरिकांच्या पाणीपट्टी संदर्भातील समस्या सोडवण्यासाठी एकदिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत तोष्णीवाल जलकुंभ, शासकीय दूध डेअरी जवळ, तोष्णीवाल लेआउट, अकोला येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये नागरिकांच्या नळ देयक संबंधित विविध तक्रारींचे निवारण थेट मनपाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. यामध्ये नळाच्या बिलातील चुकीची रक्कम, जास्त आलेले बिल, नळ असूनही बिल न मिळणे, बिल भरण्यात येणाऱ्या अडचणी तसेच इतर नळ संबंधित सर्व तक्रारींचा समावेश आहे. नागरिकांनी शिबिरात सहभागी होताना आपल्या चालू पाणीपट्टीचे देयक, यापूर्वी भरलेल्या बिलाची प्रत आणि नळाच्या मीटरचा स्पष्ट फोटो सोबत आणावा, जेणेकरून समस्या अधिक तत्परतेने सोडवता येतील, अशी



विनंती महापालिकेने केली आहे. पूर्व झोनमधील नागरिकांसाठी ही एक सुवर्णसंधी असून, आपल्या पाणीपट्टीशी संबंधित तक्रारी नोंदवून त्या एकाच ठिकाणी सोडवून घेण्याची ही योग्य वेळ आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकोला महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेत मतदार नोंदणीबाबत मार्गदर्शन

## शिक्षक मतदारसंघ निवडणूक





■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार संघाच्या दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने माध्यमिक आणि त्याहून वरील दर्जाच्या शाळांच्या मुख्याध्यापकांची कार्यशाळा आज नियोजनभवनात घेण्यात आली.

अकोला जिल्ह्यातील सर्व पात्र शिक्षकांनी विहित नमूना-१९ मधील अर्ज आवश्यक पुरावे व प्रमाणपत्रांसह दाखल करावेत. यादीचे काम परिपूर्ण होण्यासाठी मुख्याध्यापकांनी योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षक मतदारसंघासाठीच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याबाबत कार्यक्रम व वेळापत्रकाची माहिती सर्वांना दिली.

मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१(३) अन्वये जाहीर सूचना दि.३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, सूचनेची प्रथम पुनर्प्रसिध्दी दि.१५ ऑक्टोबर रोजी होईल. वर्तमानपत्रातील नोटीसीची व्दितीय पुनर्प्रसिध्दी दि.२५ ऑक्टोबर रोजी होईल.

नमूना-१९ व्दारे अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ६ नोव्हेंबर आहे. हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दि.२० नोव्हेंबर रोजी होईल. प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दि.२५ नोव्हेंबर होईल.

दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी दि.२५ नोव्हेंबर ते दि. १० डिसेंबर असा आहे. दावे व हरकती निकाली काढणे व पुरवणी यादी तयार करणे, छपाई करणे यासाठी दि.२५ डिसेंबर हा दिवस निश्चित आहे. मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी दि.३० डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे.

मतदार नोंदणी कार्यक्रमासाठी अमरावती विभागीय आयुक्त हे मतदार नोंदणी अधिकारी असून अकोला जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. त्याचप्रमाणे जिल्हयातील सर्व उप विभागीय अधिकारी हे सहायक मतदार नोंदणी असून जिल्हयातील सर्व तालुक्यांचे तहसीलदार हे पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांच्या कार्यालयामध्ये नमूना-१९ मधील अर्ज दि. ६ नोव्हेंबरपर्यत सादर करता येतील.

नमूना-१९ मधील अर्ज वरील ठिकाणी तसेच मुख्य निवडणूक अधिका-यांच्या संकेतस्थळावर व अकोला जिल्हा प्रशासनाच्या htts://akola.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सर्व पात्र शिक्षकांच्या नोंदणीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## थोडक्यात

### भुलाबाई देखावा स्पर्धेस महिलांचा प्रतिसाद

**अकोला** : शिव गौरा विवाह महोत्सव समितीच्या वतीने लोप पावत चाललेली महिलांची भुलाबाई उत्सवाची संस्कृती, लोक परंपरेचे जतन व मातृशक्तीच्यासुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी भुलाबाई देखावा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेस मातृशक्तींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत यात सहभाग घेतला.आयोजन समितीने महानगरातून भुलाबाई देखावा चे असंख्य चित्रफित माध्यमातून प्रस्ताव आमंत्रित केले होते. समितीच्या वतीने भुलाबाई देखावा स्पर्धेत प्रथम पारितोषिक ५१०० रुपये, द्वितीय पारितोषिक ३१०० रुपये व तृतीय पारितोषिक २१०० रुपये ठेवण्यात आले होते. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी राणी सती धाम येथे मोठ्या उत्सवात संपन्न झाला. यात प्रमुख पाहुणे म्हणून सी मंजुषा सावरकर, सौ प्रतीक्षा धोत्रे, सौ सुनीता अग्रवाल, सौ अर्चना शर्मा, सौ प्रभा खंडेलवाल, सौ एकता खंडेलवाल आदी उपस्थित होत्या. मान्यवर महिलांच्या उपस्थितीत यावेळी प्रथम पारितोषिक अपूर्वा बाकडे यांच्या देखव्वास बहाल करण्यात आले. द्वितीय पारितोषिक रोहिणी जढाळ यांना तर तृतीय पारितोषिक प्रीती घनबहादूर यांच्या देखाव्यास प्रदान करण्यात आले. तर सहभागी महिला स्पर्धकांना आकर्षक स्नेहभेट प्रदान करण्यात आली. शिव गौरा विवाह महोत्सव समितीचे संदीप जोशी यांनी आपल्या प्रास्ताविकात या उपक्रमाची माहिती दिली. लुप्त होत असणाऱ्या संस्कृतीतील उत्सवांना नव्या पिढीने पुन्हा नव्या जोमाने साकार करून सांस्कृतिक वारसा व परंपरा जतन करण्याचे आवाहन केले. मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# वाहनासाठी पसंतीच्या क्रमांकांचा 'आरटीओ' कार्यालयातर्फे लिलाव

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकी वाहनांसाठी नविन मालिका सुरु करण्यात आली असून, इच्छूकांनी नियमित विहित शुल्क भरुन, तसेच खाजगी चारचाकी वाहनांकरीता विहित शुल्काच्या तीनपट शुल्क भरुन आकर्षक पसंती क्रमांक राखीव करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूकांनी दि. १४ ऑक्टोबर रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते दु. २.३० दरम्यान पसंतीचे क्रमांकाच्या विहित नमुन्यातील अर्जासह आधारपत्रब, रहिवाशी पत्ता पुरावा, पॅनकार्ड या कागदपत्रंच्या साक्षंकित प्रती बंद लिफाफ्यात कार्यालयाच्या रोख विभागात जमा कराव्यात. लिफाफ्यावर वाहन मालकाचे नाव, वाहन वर्ग, पसंती क्रमांक व आधार लिंक मोबाईल क्रमांक लिहिलेला असावा. एका क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्याची यादी कार्यालयीन नोटीस बोर्डवर त्याच दिवशी दुपारी ३ वाजता लावण्यात येईल. या यादीमध्ये अर्जदाराचे नांव व पसंती क्रमांक असल्यास पसंती क्रमांक लिलावाचे शुल्क डीडी दिनांक १५ ऑक्टोबरला दुपारी २.३० वाजेपर्यंत रोख विभागात स्वीकारले जातील. अर्जासाठी त्याच दिवशी दु. ४ वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल. पसंती क्रमांकासाठी विहित सुधारित शुल्क लागू राहील.

त्यासाठी डीडी आर.टी.ओ. अकोला यानावे राष्ट्रीयकृत, शेडचुल्ड बँकेचा अकोला येथील असावा तसेच तो दोन महिन्यांपेक्षा जास्त जुना नसावा. अन्य नावे असलेला डीडी स्वीकारला जाणार नाही. त्यासोबत अर्जदारास पॅनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावाकरिता आकर्षक / पसंती क्रमांकासाठी मुळ विहित शुल्काचा एक डी.डी. व लिलावासंदर्भात अर्जदाराच्या इच्छेनुसार जादा रकमेचा दुसरा डीडी हे आवश्यक राहतील.लिलावाच्या डीडीचे फक्त एकच पाकीट ग्राह्य धरले जाईल. एकाच अर्जदाराने एकाच क्रमांकाकरिता एकापेक्षा जास्त अर्ज टाकल्याचे आढळून आल्यास असा अर्ज रद्द समजण्यात येईल.

# दिशा जिमनॅस्टिक स्पर्धामध्ये राजस्तरावर

**अकोला:** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत उपचांचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती विभाग अमरावती श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ व अमरावती जिल्हा हौसी जिमनॅस्टिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमरावती विभागीय जिमनॅस्टिक क्रीडा स्पर्धेत १९ वर्षाखालील वयोगटामध्ये जय गजानन ज्युनिअर कॉलेज जलब येथील दिशा रविंद्र रावणचवरे हिने रिदमिक जिमनॅस्टिक प्रकारात घवघवीत यश मिळवून राज्यस्तरावर नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शत्रुघ्न बिरकड, प्राचार्या कल्पना सुरडकर प्रशिक्षक राहुल मॅडम, पहुरकर,, आई प्रा. सुनंदा रावणचवरे वडील प्रा. रविंद्र रावणचवरे सर्व प्राध्यापक वृंद होते.

# ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहा म्हणजे संतांचा दिवाळी, दसरा : श्री.ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद महाराज

■अकोट,दि १३ (प्रतिनिधी) :

लौकिक व्यवहारातील दसरा दिवाळी सण हा विविध भौतिक मार्गांनी साजरा करण्यात येतो. परंतु, संतांच्या तात्विक चिंतनातील खरा दसरा आणि दिवाळी सण म्हणजे साधुसंतांची भेट होऊन उन्नत जीवनाची प्राप्ती होणे, असे प्रतिपादन ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांनी केले. स्थानिक श्री संत नरसिंह महाराज समाधी मंदिरात सुरू असलेल्या ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाच्या सांगते प्रसंगी आयोजित काल्याच्या कीर्तनातून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आकोट शहरातील व परिसरातील जनतेला संत वाययातील दसरा – दिवाळी सण कळावा याकरिता सद्गुरू श्री संत वासुदेव महाराजांनी गत ३६ वर्षांपूर्वी हा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभीला आणि अगदी बरोबर दसरा दिवाळीच्या मध्येच हा सप्ताह नियोजित केला. या सप्ताहाच्या माध्यमातून अनेक ज्ञान सत्र त्यांनी चालविले. त्यांच्या आणि सद्गुरू श्री संत नरसिंह महाराज यांच्या कृपाशीर्वादाने हा सप्ताह अनेक चढ – उतार पार करीत अखंड सुरू आहे. या दोन्ही संतांच्या तथा श्री ज्ञानोबाराय, श्री तुकोबाराय, आदी संतांच्या चरित्रावर त्यांनी प्रकाश टाकला.



त्याचप्रमाणे काल्याच्या कीर्तनाच्या औचित्याने 'चरित्र ते उच्चारावे, केले देवे गोकुळी' या दंडकानुसार भगवान श्रीकृष्ण यांनी बाळ क्रीडा करीत असताना केलेल्या विविध लिलांचे वर्णन त्यांनी मांडले. या श्रीकृष्ण लीलांच्या माध्यमातून प्रकट होणारा दिव्य संदेशसुध्दा त्यांनी प्रतिपादित केला. यावर्षी सप्ताहाचे ३६ वे वर्ष असल्याने त्रितपपूर्ती सोहळा विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यामध्ये ज्ञानेश्वरी, नरसिंह लीलामृत, यासह श्री संत गजानन महाराज चरित्राचे सुद्धा पारायण करण्यात आले.

# मनपा उर्दू माध्यमिक शाळेचे शिक्षक नईम फराज यांना राज्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार

## मनपा आयुक्त तथा प्रशासक यांच्या शुभ हस्ते नईम फराज यांचे सत्कार

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र शासन उर्दू अकादमीच्या वतीने सन २०२३ करिता मनपा उर्दू मुलांची शाळा क्र. ८, माळीपुरा, अकोला येथील वरिष्ठ शिक्षक, लेखक, कवी व शायर नईम फराज यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०१९ नंतर पुन्हा एकदा राज्यस्तरीय सन्मान मिळवत त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य, विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता घडविणे आणि उर्दू भाषेच्या प्रगतीसाठी केलेल्या योगदानाची दखल घेत ही गौरवाची पदवी प्राप्त केली. या यशानिमित्त आज अकोला महानगरपालिकेत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या हस्ते त्यांच्या दालनात मनपा शिक्षक नईम फराज यांचा सत्कार करण्यात आला तसेच मनपा आयुक्त यांनी उर्दु भाषेविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, सहा. आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, मनपा शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर, स्वीय सहायक जितेंद्र तिवारी, नगररचना विभागाचे संदीप गावंडे, क्षेत्रीय अधिकारी गजानन घोंगे, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनुप चौधरी, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, कनिष्ठ अभियंता आकाश शिवनीवार, संजय खराटे, अन्वर हुसेन, सुशीला सोनोने आदींची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर यांनी केले.



# रोजगार व करिअर मार्गदर्शन मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** भारतीय बौद्ध महासभा, तिष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी आणि विज्डम अॅकडमी यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रप्रस्थ टॉवर, अकोला येथे भव्य रोजगार व करिअर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन प्रा. अंजलीताई आंबेडकर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बौद्ध महासभेचे अध्यक्ष पी. जे. वानखडे होते. यावेळी मंचावर तिष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे सचिव विष्णुदास मोंडोकार, प्रा. स्वप्निल बोरकर, डॉ. धर्मेंद्र राऊत, अरुण खिरडकर उपस्थित होते. सध्याच्या घडीला शासकीय नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत असल्याने खाजगी क्षेत्रातील संधींचा शोध घेणे गरजेचे झाले आहे. ही गरज लक्षात घेऊनच या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा. अंजलीताई आंबेडकर आंबेडकर यांनी ग्रामीण भागातही असे मेळावे आयोजित व्हावेत, यासाठी जिल्हा परिषद सहकार्य करेल, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेच्या वाचनाने झाली, जे इंजि. विनोद खंडारे यांनी सादर केले. सूत्रसंचालन दीपा बाहेकर यांनी केले.

# महाराष्ट्रात अमृततर्फे दीपावलीमध्ये होणार विश्वविक्रमी दुर्गोत्सव

## छत्रपती शिवरायांना अनोखी मानवंदना



■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दुर्ग, गड यांचा सार्थ अभिमान अवघ्या भारतदेशाला आहे. दर दिवाळी सणामध्ये बच्चेकंपनी मातीचे किल्ले बनवून छत्रपतींच्या कार्याचे स्मरण आणि अभिवादन करत असते. याच दुर्गांच्या प्रतिकृती साकारण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र संसोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात 'अमृत'ने दुर्गोत्सवाचे आयोजन या दीपावलीमध्ये केले आहे. हा एक विश्वविक्रम करण्याचा संकल्प अमृतने केला आहे.

शिवछत्रपतींच्या पराक्रमांचे साक्षीदार असलेल्या १२ दुर्गांना युनेस्कोच्या जागतिक वारसाच्या वास्तूंमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या प्रयत्नांना यश आले आणि साऱ्या महाराष्ट्राचा ऊर अभिमानाने भरून आला. दर वर्षी दिवाळीच्या सुट्टीमध्ये घरोघरी बालदोस्त आणि तरुण, ज्येष्ठ मंडळीसुद्धा दुर्गांच्या प्रतिकृती साकारतात. नागरिकांनी आपल्या अंगणात, बाल्कनीमध्ये, हाऊसिंग सोसायटीच्या सार्वजनिक जागांमध्ये अगदी जमेल तिथे या १२ दुर्गांपैकी कोणतीही एक हुबेहूब प्रतिकृती बनवावी आणि आपल्या संकेतस्थळावर http://www.durgotsav.com त्यासोबतचे सेल्फी पाठवावेत.

दुर्गोत्सवात सहभागी झालेल्या साऱ्यांच्या चित्रांचे संकलन केले जाईल. तसेच या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांनाच माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने 'अभिनंदन पत्र' पाठवण्यात येणार आहे. याशिवाय अमृतने निर्माण केलेल्या अमृत विद्या या डिजिटल लर्निंग प्लॅटफफॉर्मवरील शिवछत्रपतींचा गौरवशाली इतिहास व त्यातून आज घ्यावयाचे धडे या विषयावरील ९९९/- रुपयांचे प्रशिक्षण, निशुल्क उपलब्ध करून दिले जाईल. यामध्ये स्वराज्यरक्षक दुर्ग, शिवरायांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना, कवी भूषण यांची कवने, स्वराज्यासाठी लढलेल्या स्वराज्ययोद्धयांच्या परिचयाची शृंखला या साऱ्या गोष्टींचा आस्वाद सहभागी होणाऱ्या साऱ्यांना मिळेल.

या बारा दुर्गां पैकी एक साकारा प्रतिकृती रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड, पद्मदुर्ग (सुवर्णदुर्ग).गडदुर्ग हे १२ गडदुर्गांपैकी कोणताही एक बनवावागडदुर्ग चा आकार कमीत कमी दोन फुट असावा जास्तीत जास्त कितीही असावासेल्फी मध्ये गडदुर्ग चा जास्तीत जास्त भाग दिसेल असा असावादुर्गोत्सव २०२५ या कार्यक्रमाचे अनावरण शिवश्रुष्टी हिस्टोरिकल थीम पार्क पुणे येथे अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री विजय जोशी यांचे हस्ते पार पडले. या कार्यक्रमात अमृत चे विशेष कार्यकारी अधिकारी श्रीराम बेंडे, प्रवीण पांडे आणि सिद्धेश्वर वरणगावकर आणि राज्य व्यवस्थापक दीपक जोशी उपस्थित होते. या कार्यक्रम दरम्यान महाराष्ट्रात जास्तीत जास्त आबालवृद्धांनी गडदुर्ग बनवून, त्यासह सेल्फी काढून, दुर्गोत्सवाचे संकेतस्थळावर अपलोड करून, शिवरायांना अनोखी मानवंदना देऊया, या असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय जोशी यांनी केले आहे.

# रावण दहन भव्य कार्यक्रम रद्द; प्रतिकात्मक रावण दहनातून–धनाकर्ष सुपुर्त

### शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीचा आणि समाजातील जबाबदारीचा संदेश



■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

यंदाच्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील शेतकरी, पशुपालक आणि सामान्य नागरिक गंभीर संकटात आले आहेत. शेतजमिनी वाहून गेल्या, पिकांचे मोठे नुकसान झाले, पशुधनाचा मोठा तोटा झाला आणि अनेक कुटुंबांचे जीवनस्तर संकटात आले. अशा परिस्थितीत पारंपारिक उत्सव भव्य स्वरूपात साजरे करणे अनेकांसाठी कठीण झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर निलेश देव मित्र मंडळ आणि अँड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प, अकोला यांनी शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत देण्याचा आणि समाजातील जबाबदारी जपत सामाजिक संदेश देण्याचा उपक्रम राबविला. 'धनाकर्ष सुपुर्त' या कार्यक्रमात केवळ आर्थिक सहाय्य नाही तर समाजातील एकजुटी, सहकार्य आणि संवेदनशीलतेचा संदेश दिला गेला.गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५ रोजी बिर्ला राम मंदिरात झालेल्या कार्यक्रमाला माजी गृहराज्यमंत्री व अकोला पालकमंत्री मा. डॉ. रणजीत पाटील, जयंतराव सरदेशपांडे, नरेश बियाणी, तसेच निलेश देव, गिरीश गोखले, अजय शास्त्री, दिलीपकाका देशपांडे यांच्यासह निलेश देव मित्र मंडळ कार्यकारीणी उपस्थित होत्या. शेकडो अकोलेकरांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाला भावनिक उंची दिली.हा उपक्रम केवळ आर्थिक मदत नाही, तर समाजातील जबाबदारी, एकजुटी आणि संवेदनशीलतेचा संदेश देणारा आहे. खरी दिवाळी तेव्हा आहे, जेव्हा शेतकऱ्यांच्या घरात दिवा जळेल आणि आनंद असेल.या उपक्रमातून अकोल्यात सामाजिक बांधिलकीचे अनोखे उदाहरण घडले. युवकांनी आपल्या परंपरेची जपणूक करत खर्च टाळला आणि तो समाजासाठी वळवला, ही गोष्ट विशेष प्रेरणादायी ठरली.

### धोबी परिट समाज आरक्षण समन्वय समितीचे

# अनुसूचित जातीचे आरक्षणासाठी निवेदन



■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र धोबी परिट समाज आरक्षण समन्वय समिती यांच्या वतीने आज अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात आरक्षणाबाबत मागणीसंदर्भात निवेदन सादर करण्यात आले.बुलढाणा व भंडारा जिल्ह्यात महाराष्ट्र निर्मितीपूर्वी समाजाला अनुसूचित जाती वर्गामध्ये आरक्षण मिळालेले होते. त्याच पार्श्वभूमीवर समाजाला पुन्हा त्याच पद्धतीने अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यात यावे, या मागणीसाठी हे निवेदन देण्यात आले.या वेळी समाजाचे प्रतिष्ठित समाजसेवक ओम बुंदेले, विजयजी दूधानडे, चौधरी विष्णुदासजी मुडोकार, मनोजभाऊ दूधानडे, गोपाल मोकडकर, संजयजी केनेकर, सचिनजी चंदन, सौ. नंदाताई मानकर, सौ. रेशमाताई चांदूरकर, मुन्नाभैया, जयराज सुरेश गिरधारीजी बुंदेले, विजय गिरधारीजी बुंदेले, सुरेश धनसिंहजी बुंदेले, हिराजी बुंदेले, अनिलजी किलेदार, राजुभैया धुराटक, श्यामजी बुंदेले, मनीषजी बुंदेले, रविभैया अहीर, सुनीलजी चंदनबटवे, हेमंतजी चंदनबटवे, बंटीभैया कनौजिया, सागरभैया कनौजिया, राजकुमार परदेशी, राजू कनौजिया आदी मान्यवर उपस्थित होते.

# मूर्तिजापूरातील दोघे १ वर्षांसाठी हद्दपार

**मुर्तिजापूर** : स्थानिक गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पोलिस स्टेशन मुर्तीजापूर शहर हद्दीतील गुन्हेगारी प्रवृत्तीचे दोन इसम रुपेश रूपेश श्रीकृष्ण काळे रा. वसंत नगर, मुर्तीजापूर व अब्दुल जाफर, अब्दुल हन्नान वय २४ वर्षं परदेशीपुरा, मुर्तीजापूर यांना विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याने अनुक्रमे ९ वर्षे व १ वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

रुपेश श्रीकृष्ण काळे याने चोरी, वाहनचोरी तसेच घरफोडी, परिसरात भय निर्माण करणारे गुन्हे केले होते. याच्यावर देखील मारहाण, गंभीर दुखापत, शस्त्राने हल्ला करण्याची तयारी, दंगा, सार्वजनिक शांततेस बाधा आणणारे प्रकार यासह अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. या दोघांविरुद्ध नागरिकांत दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिस स्टेशनकडून करण्यात आलेल्या प्रस्तावावर जिल्हा पोलिस अधीक्षक अचिंत चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली मुळे व पोलिस निरीक्षक अजित जाधव यांच्या पुढाकाराने ही कारवाई पार पडली. पोलिस अधीक्षक कार्यालय अकोला येथून मिळालेल्या मंजुरीनुसार, दोन्ही आरोपींना अनुक्रमे १वर्षे अकोला, अमरावती, वाशिम जिल्ह्यांमधून आणि १ वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. या कारवाईमुळे शहरात कायदा-सुव्यवस्थेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## इसमाची बाळापूरनजीक आत्महत्या

**बाळापूर** : बार्शिटाकळी तालुक्यातील सिंदखेड मोरेश्वर येथील ४३ वर्षीय इसमाने बाळापूरनजीक असलेल्या बाभूळगाव शेत शिवारामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना १२ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली आहे.या संदर्भात पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी सत्यशील बाबाराव वानखडे (३८) रा. सिंदखेड मोरेश्वर यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे त्यांचा भाऊ संघशिल बाबाराव वानखडे (४३) याने शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविले होते. तो नेहमी त्या टेन्शनमध्ये राहत होता. त्या कारणामुळे त्याने कुणालाही न सांगता बाळापूरनजीक असलेल्या बाभूळगाव शिवारातील स.न. ४६/१ मधील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. संघशिल बाबाराव वानखडे यांच्या मृत्यूप्रकरणी बाळापूर पोलिसांनी कलम बीएनएस अन्वये आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. पुढील तपास बाळापूर पोलिस करीत आहेत.

# थोडक्यात

## स्त्री रुग्णालयाच्या विसावा हॉल वर दारुड्यांचा कब्जा

**अकोला** : अकोल्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयात अकोला जिल्ह्यासह आसपासच्या ग्रामीण भागातून दररोज शेकडो गर्भवती महिला प्रसूतीसाठी येतात. या महिलांसोबत येणाऱ्या नातेवाईकांसाठी रुग्णालय प्रशासनाने 'विसावा हॉल' या नावाने तात्पुरती निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. मात्र सद्यस्थितीत हा हॉल बेघर लोक, दारूडे आणि संशयित व्यक्तींचा अड्डा बनला असून, येथे येणाऱ्या नातेवाईकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, विसावा हॉलमध्ये सध्या अस्वच्छता, दुर्गंधी आणि रात्री होणाऱ्या चोरीच्या घटना वाढल्या आहेत. विशेष म्हणजे, या परिसरात एकही सुरक्षा रक्षक तैनात नाही, त्यामुळे कोणालाही सहज प्रवेश मिळतो. रात्री झोपलेल्या नातेवाईकांचे मोबाईल किंवा इतर सामान चोरीला जाण्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. दारूडे आणि बेघर लोक येथेच वास्तव्य करत असल्याने, रुग्णांच्या कुटुंबीयांना अस्वस्थता व मानसिक असुरक्षिततेचा अनुभव येत आहे. रुग्णालय प्रशासनाने जरी विसावा हॉल उपलब्ध करून दिला असला, तरी त्याचे व्यवस्थापन व देखरेख पूर्णतः दुर्लक्षित आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने येथे सुरक्षा रक्षक नेमावेत, तसेच फक्त रुग्णांच्या नातेवाईकांनाच प्रवेश दिला जावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## कोजागिरी पौर्णिमेनिमित्त ज्येष्ठ नागरिक संघातर्फे संगीत कार्यक्रम

**अकोला :** अकोला ज्येष्ठ नागरिक आयोजित संघाच्यावतीने संगीतमय व नाट्यमय कोजागिरीचा ज्येष्ठांनी आनंद घेतला. खरा तो एकची धर्म ही साने गुरुजींची प्रार्थना निशा कुलकर्णी व ज्योती जोशी यांनी गायन केल्यानंतर बी. आर. हायस्कूलच्या प्रांगणामध्ये ज्येष्ठ नाट्यकर्मी दिलीप देशपांडे यांनी 'स्मृतींच्या मशाली' ही धनंजय देशपांडे लिखित एकपात्री नाट्यछटा सादर करून येथील स्वातंत्र्य संग्रामाचा मूतीर्मत इतिहास उभा केला उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. दिलीप देशपांडे यांची ही एकपात्री नाट्यछटा लोकप्रिय असून, त्यांनी देश विदेशात प्रयोग केले आहेत. प्रकाश जोशी यांनी त्यांचा परिचय करून दिला. आनंद जहागीरदार यांनी बहारदार भक्तीगीते, भावगीते, देशभक्तीपर गीतांची उपस्थितांना मेजवानी दिली. त्यांनी आपल्या गायनाला गणेश वंदनेने सुरुवात करून 'मन रे तू काहे ना धीर घरे' 'सखी मंद झाल्या तारका' 'जे जे हवे जीवनी' इ. एकापेक्षा एक सरस गीतांचे गायन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमात महिला समिती अध्यक्ष संध्या संगवई यांनीही 'ओ चंदा' गीत सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. तर मोहनशास्त्री जलतारे यांनी कोजागिरीनिमित्त अकोला ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने आयोजित संगीतमय कार्यक्रमासह नाट्यछटेचा ज्येष्ठांनी आनंद घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष चंद्रकांत कुळकर्णी होते. सचिव प्राचार्य डॉ सत्यनारायण बाहेती यांनी सूत्र संचालन केले. प्रकाश शेगोकार यांनी आभार मानले. संध्या संगवई यांच्या पसायदान गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या वेळी अभियंता विनायकराव पांडे, ना. मा. मोहोड, रमेश बाहेती, नारायण अंधारे अशोक कुळकर्णी, चौथमल सारडा, रामेश्वर फुंडकर डॉ. सुहास काटे, प्रमोद देशमुख, कन्हैया चेन्नी थला, सुनील खोत, प्रभुनारायणसिंह बिसेन, बाळकृष्ण काळे उपस्थित होते.

## अतिवृष्टीमध्ये अकोला तालुक्याचा समावेश करा !

**अकोला :** अतिवृष्टीमध्ये अकोला तालुक्याचा समावेश करावा, अशी मागणी वंचित बहुजनआघाडीनेअकोलातालुक्याचावतीने तालुकाध्यक्ष किशोर जामनिक, पवनबुटे यांच्या नेतृत्वात १० ऑक्टोबरला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे पीक खरडून गेले आहे तर काही ठिकाणी पाण्याने वाहून गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार आहे. त्यातच शासनाने अकोला तालुका अतिवृष्टी बाधित यादीतून वगळून शेतकऱ्यांवर आणखी अन्याय केलेला आहे. त्यामुळे शासनाने अकोलातालुक्याचा तातडीने दुष्काळ बाधित यादीत समावेश करावा अन्यथा वंचित बहुजन आघाडी आंदोलन छळेल, असा इशाराही निवेदनातून दिला आहे. निवेदन देतेवेळी वंचितचेशरद इंगोले, दीपक सावंग, नितीन सपकाळ, धीरज देशमुख, मोहन तायडे, वसंता नागे, अमोल लहरिया, आतिष सिरसाठ, सतीश उभे, मनिष वानखडे, निलेश गोरे, दत्ता डाबेराव, मिलिंद खंडारे, राजकुमार क्षीरसागर, अमोल भगत उपस्थित होते.

# गजानन पुंडकर लोकसेवा पुरस्काराने सन्मानित !

## वाशिंगटन डीजीटल युनिव्हरसीटीने दिली मानद डॉक्टरेट पदवी

■अकोट,दि १३ (प्रतिनिधी) :



अकोला तालुक्यातील आसेगाव बाजार येथे शेतकरी कुटुंबात जन्मलेले गजानन पुंडकर यांना सामाजकार्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबाबत अमेरिकेतील वाशिंगटन डीजीटल आणि युनिव्हरसीटीने मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले. या जागतिकस्तरावरील पुरस्काराने पुंडकर यांची समाजसेवा, प्रामाणिकपणा लोकाभिमुख नेतृत्व अधोरेखीत होत असून, जिल्हयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. दिल्ली येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात त्यांना हा सन्मान देण्यात आला. गजानन पुंडकर यांनी आपले केल्यानंतर शिक्षण पूर्ण आयुष्यातील पहिली पायरी समाजकार्यातूनच टाकली. १९९९ साली त्यांनीप्रथमच अकोला जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडणूक लढवून विजय मिळवला. २००७ ते २००९ या काळात ते अकोला जिल्हा परिषद उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांनी आरोग्य, शिक्षण, आणि ग्रामीण विकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. रुग्णसेवा, गरीब विद्यार्थ्यांसाठी मदत, तसेच ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

# आता सर्व दुकाने राहू शकतात २४ तास उघडी

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

बिअर बार व मद्य व्यवसायाशी संबंधित सर्व दुकाने वगळता अन्य सर्व प्रतिष्ठाने दिवसभर अर्थात २४ तास सुरूठेवण्यासाठी शासनाने परवानगी दिली असून यामुळे आता व्यापारी आणि ग्राहकांची चांगली सोय होणार आहे. आमदार वसंत खंडेलवाल यांनी यापूर्वीच या संदर्भात शासनाकडे मागणी लावून धरली होती. या निर्णयानंतर त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. सणासुदीच्या काळात दुकानांवरील गर्दी लवकर कमी होत नाही, परिणामी अनेकदा दुकाने रात्री उशिरापर्यंत उघडीठेवावी लागतात. मात्र, रात्री १० नंतर दुकाने उघडी दिसल्यास त्यांना पोलिसांकडून धाक दपट करण्यात येत होती. प्रसंगी कारवाईचा बडगाही उगारण्यात येत होता. यामुळे ग्राहकांबरोबरच व्यापारी उद्योजकांचीही मोठी पंचायत झाली होती.अकोल्यातही अशा काही घटना घडल्या त्यावेळी आमदार वसंत खंडेलवाल यांनी पुढाकार घेऊन संबंधित पोलिसांना अशा प्रकारची दडपशाही न करण्याच्या सूचना केल्या होत्या. दरम्यान गेल्याच महिन्यात शांततासमितीच्या सभेत आमदार खंडेलवाल यांनी या प्रतिष्ठानांना वेळेचे कोणतेही बंधन नसल्याचे सर्वांच्या लक्षात आणून दिले होते. शासनाने आता त्याबाबत स्पष्ट्च खुलासा केला आहे. महाराष्ट्रशासनाने १ आक्टोबर रोजी काढलेल्या आदेशामध्ये आता मद्यव्यवसाय वगळता सर्व आस्थापनांना २४ तास आपले प्रतिष्ठान सुरू ठेवण्याची परवानगी दिली आहे. व्यापारी आणि ग्राहकांच्या हिताचा हा निर्णय घेतल्याबद्दल आमदार खंडेलवाल यांनी वसंत मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

## दिवसभरात १ हजारांवर फुकट्या प्रवाशांवर कारवाई

अकोला : दक्षिण मध्य रेल्वे विभागात अकोला – पुर्णा मार्गासह विविध मार्गावर धावत्या रेल्वे गाड्यांमध्ये तिकीट तपासणी मोहिम राबविण्यात आली असता एकाच दिवशी १ हजार २०२ विनातिकीट, अनियमित प्रवासी तसेच अनबुक सामानासह ६७२४ प्रवास करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. ही एका दिवसाची सर्वाधिक कारवाई ठरली असून, एकूण ४९ लाख दंड व तिकीट रक्कम वसूल करण्यात आली.दमरेच्या वतीने या मोहिमेत अकोला- पुर्णा - अकोला मार्गासह मनमाड-औरंगाबाद, परभणी- परळी, परभणी- नांदेड, आदिलाबाद-मुदखेड या मार्गावरील अनेक एक्सप्रेस व प्रवासी गाड्यांची सखोल तपासणी करण्यात आली.

## कृषी महाविद्यालय अकोल्याच्या विद्यार्थ्यांन कडून

# बाभुळगाव यथे पशुधनाच्या लसीकरणाबाबत जनजागृती

■अकोला,दि १३ (प्रतिनिधी) :

कृषी महाविद्यालय, अकोला येथील ठअथए २०२५ च्या अंतर्गत सहभागी विद्यार्थ्यांनी ९ ऑक्टोबर २०२५ रोजी बाभूळगावातील शेतकरी तसेच गोपालक यांचासाठी एक महत्त्वपूर्ण लसीकरण जनजागृती उपक्रम राबवला. हा उपक्रम पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी अ , बाभूळगाव पंचायत समिती , अकोला येथे राबविण्यात आला. जातिवंत पशुधन संवर्धन, व्यवस्थापन व लसीकरण विषयी माहिती डॉ ज्ञानेश पोठे यांनी दिली. नियमित लसीकरण, पशुधनाचे संरक्षण ही काळाची गरज आहे म्हणूनच रोग येण्यापूर्वीच प्रतिबंध करने व त्यासाठी लसीकरण हेच उत्तम उपाय मानता येईल असे त्यांनी सांगितले.जनावरांना नियमित



लसीकरण केल्यास संसर्गजन्य आजाराचे प्रमाण कमी होऊन जास्तीत जास्त उत्पादन मिळू शकते. दुग्धव्यवसायात दुधाळ जनावरांना निरोगी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जनावरांना विविध प्रकारच्या जिवाणू व विषाणूपासून संसर्गजन्य रोग होतात. या रोगांमुळे दुधाळ जनावरांचे दूध उत्पादन घटते, जनावरांची कार्य करण्याची क्षमता कमी होते व त्यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पादनाची प्रत खालावते. त्यामुळे दुधव्यवसाय तोट्यात जाऊ शकतो. जनावरांमध्ये विशिष्ट रोगांसाठी लस उपलब्ध आहे आणि अशाप्रकारची लस दिल्यानंतर रोगांचा प्रादुर्भाव टाळणे शक्य होते. लसीकरणामुळे जनावरांची रोगप्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होते, मात्र लसीकरणापासून मिळणारी रोगप्रतिकार शक्ती विशिष्ट कालावधीसाठी असते, त्यामुळे पशुवैद्यकांच्या सल्ल्यानुसार लसीकरण करावे.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.संजय भोयर सर तसेच पशुसंवर्धन व दुग्ध शाखा प्रमुख डॉ . प्रकाश कहाते व रावे समन्वयक डॉ.अनिल खाडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

## लायन्स इंटरनॅशनल अधिवेशनाच्या चेअरमनपदी सुभाष चांडक यांची नियुक्ती

**अकोला** : लायन्स इंटरनॅशनल ज्यामध्ये २१२ देशांचा समावेश आहे अंतर्गत ३२३४ एच २ चा शपथविधी सोहळा डिस्ट्रिक्ट गव्हर्नर अश्विनकुमार बाजोरिया यांच्या अध्यक्षतेत नुकताच संपन्न झाला. या रंगारंग सोहळ्यात विदर्भ, मराठवाडा,खानदेश मधील ७०० पदाधिकाऱ्यांनी भाग घेतला. शपथविधी अधिकारी सुनीलकुमार आर, कन्व्हेनर यश बाजोरिया,को कन्व्हेनर सुनील बाजोरिया, प्रकाश आनंदानी, संदीप अग्रवाल तर प्रमुख पाहुणे म्हणून पास्ट इंटरनॅशनल डायरेक्टर डॉ नवल मालू,कॅट एरिया लिडर विनोद वर्मा उपस्थित होते.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

